# स्वराज्य रक्षक श्री छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त युवाशक्ती करिअर मार्गदर्शन मेळाव्यास सस्नेह भेट






स्वराज्य रक्षक श्री छत्रपति संभाजी महाराज यांच्या जयंतनिमित्त लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्था वडाळा च्या वतीने शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था सोलापूर आयोजित व्यवसाय व करियर मार्गदर्शन मेळाव्यास भेट देण्यात आली या शिबिरा मध्ये ८० प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थिती होती.दिनांक १५/०५/२०२३ रोजी शासकीय आयटीआय सोलापूर यांच्या वतीने आयोजित केलेल्या या मेळाव्यामध्ये विविध क्षेत्रांमधील नामांकित व्यक्तींनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजगार तसेच स्वयंरोजगाराबद्दल मार्गदर्शन केले, राष्ट्रीय पातळीवर आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर करियर घडवत असताना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षणार्थी कशाप्रकारे वाटचाल करू शकतात याबाबत सन्माननीय अतिथी व यजमान शिक्षक गणांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आयटीआय प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर इंजीनियरिंग क्षेत्रातल्या संधी, शिक्षण, विविध शासकीय औद्योगिक क्षेत्रातल्या संधी याबाबत ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या मेळाव्यामध्ये लोकमंगल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थ्यांना या शिबिराचा लाभ व्हावा याकरिता प्राचार्य माननीय श्री योगेश गायकवाड सर यांनी विशेष योगदान दिले.